**गुणदान पद्धती**

माध्यमिक शालांत परीक्षा २०२६

**मराठी (विषय कोड ००९)**

प्रश्नपत्रिका कोड ८

**एकूण गुण – ८०**

| **परीक्षकांसाठी सर्वसाधारण सूचना -** |
|---|
| १) तुम्हाला माहीत आहे की उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन हे विद्यार्थ्यांच्या वास्तविक आणि योग्य मूल्यांकनासाठी सर्वात महत्त्वाची प्रक्रिया आहे. मूल्यांकनात झालेली एक छोटीशी चूक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यावर, शिक्षण प्रणालीवर तसेच शिक्षण पेशावर दुष्परिणाम करू शकते. म्हणूनच मूल्यमापनातील चुका टाळण्यासाठी, मूल्यांकन करण्यापूर्वी सर्व परीक्षकांनी कृपया, 'मूल्यांकन मार्गदर्शक तत्त्वे' काळजीपूर्वक वाचून समजून घ्यावीत.<br>**२) "मूल्यांकन एक गोपनीय कार्य आहे कारण ते आयोजित केलेल्या परीक्षा, मूल्यांकन आणि इतर अनेक पैलूंशी संबंधित आहे. वरील बाबी कोणत्याही प्रकारे सार्वजनिक होणे, परीक्षा पद्धतीला बाधा आणू शकते आणि लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनावर आणि भविष्यावर परिणाम करू शकते. हे धोरण, दस्तऐवज इतरांना सांगणे, कोणत्याही मासिकात प्रकाशित करणे किंवा वर्तमानपत्र, वेबसाइट इत्यादींमध्ये छापणे, हे अवैध आहे. असे केल्यास विविध नियमांनुसार बोर्ड आणि भारतीय दंड संहिता (IPC) अंतर्गत दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते."**<br>३) मूल्यांकन हे गुणदान पद्धतीत दिलेल्या सूचनांनुसार केले जावे. ते कोणत्याही व्यक्तीच्या समजुतीवर किंवा इतर कोणत्याही बाबींच्या आधारावर केले जाऊ नये. गुणदान पद्धतीचे काटेकोरपणे पालन तसेच अनुसरण केले जावे. **तथापि, मूल्यांकन करतांना, जे उत्तर नवी माहिती किंवा ज्ञानावर आधारित आहे आणि/किंवा जे नावीन्यपूर्ण आहे, त्यांचे योग्यतेनुसार मूल्यांकन करून योग्य गुण दिले जावे. इयत्ता - दहावीमध्ये, अपेक्षित कौशल्यांवर आधारित प्रश्नांचे मूल्यांकन करतांना, कृपया दिलेले उत्तर बारकाईने समजून घ्यावे. एखादे उत्तर गुणदान पद्धतीमध्ये समाविष्ट नसले तरीही विद्यार्थ्यांनी योग्य कौशल्याचा वापर केला असेल, तर त्यांना योग्य गुण देणे आवश्यक आहे. <u>(स्वमत व लेखनकौशल्यासाठी लागू)</u>**<br>४) गुणदान पद्धतीमध्ये उत्तरांसाठी फक्त आवश्यक मुद्दे दिले आहेत. हे केवळ मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात आहे आणि पूर्ण उत्तराचा भाग नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे, आणि जर अभिव्यक्ती योग्य असेल तर त्यांना त्यानुसार योग्य गुण दिले जावेत.<br>५) पहिल्या दिवशी मुख्य परीक्षकाने प्रत्येक सहाय्यक परीक्षकाद्वारे मूल्यांकन केलेल्या पहिल्या पाच उत्तरपुस्तिका तपासाव्यात, जेणेकरून हे समजेल की प्रत्येकाने मूल्यांकन पद्धतीमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे योग्य पालन केले आहे. जर त्यात काही भिन्नता आढळली, तर विचारविनिमय आणि चर्चेअंती निर्णय घेतला जावा. प्रत्येक सहाय्यक परीक्षकाकडून गुणदान पद्धतीमध्ये कोणतीही तफावत राहिलेली नाही, हे सुनिश्चित झाल्यावरच पुढील उत्तरपत्रिकांचे वाटप करावे.<br>६) सहाय्यक परीक्षकांनी योग्य उत्तरासाठी (✓) चिन्ह द्यावे आणि चुकीच्या उत्तरासाठी (X) चिन्ह द्यावे. मूल्यांकन करतांना एखाद्या (दीर्घोत्तरी वा लेखन कौशल्य) योग्य उत्तराच्या प्रत्येक मुद्द्याला (✓) चिन्ह तसेच चुकीच्या उत्तराला (X) चिन्ह सतत वापरू नये, असे केल्यास, असे वाटू शकते की तेथे गुणदान झालेले नाही. **सर्व परीक्षकांकडून ही सर्वसामान्य चूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे.**<br>७) जर एखाद्या प्रश्नाचे उपभाग असतील, तर प्रत्येक भागासाठी योग्य गुण कृपया, उजव्या बाजूस द्यावे. प्रश्नाच्या विविध भागांसाठी दिलेले गुण एकत्र करून त्याचे एकूण गुण डाव्या बाजूच्या समासात लिहावे आणि त्याला वर्तुळ करावे. याचे काटेकोरपणे पालन केले जावे. |

८) प्रश्नात कोणताही उपभाग नसल्यास, डाव्या हाताच्या समासात गुण दिले जावेत आणि त्यास वर्तुळ केले जावे, याचेदेखील काटेकोरपणे पालन करावे.

९) जर एखाद्या विद्यार्थ्याने अतिरिक्त प्रश्नाचे उत्तर लिहिले असेल तर, अधिक गुणांच्या प्रश्नाचे उत्तर ग्राह्य धरावे आणि दुसरे उत्तर **"अतिरिक्त प्रश्न" – (Ext.)** असे चिन्हांकित करावे. (मराठी ही द्वितीय भाषा असल्याने क्रमवारीतील कोणतीही अचूक उत्तरे ग्राह्य धरली जावीत व त्याप्रमाणे एकूण गुणदान करावे.)

१०) विद्यार्थी जर शुद्धलेखनाची एकच चूक वारंवार करत असेल तर त्याचे त्या चुकीसाठी एकदाच गुण कापावेत, परत परत त्याच चुकीसाठी गुण कापू नये. (हा नियम व्याकरणिकदृष्ट्या शुद्धलेखनाच्या प्रत्येक शब्दासाठी लागू आहे.)

११) प्रश्नपत्रिकेनुसार उत्तरपत्रिकेत गुणदान करताना, मुखपृष्ठावर पूर्ण गुणांकन करावे. (उदा. ० ते ८०/७०/६०/५०/४०/३० गुण). एकूण गुण देताना अर्धा गुण न देता तो पूर्ण करावा. (उदा. ६५ १/२ = ६६ (केवळ मुखपृष्ठावर (Grand Total)).

१३) उत्तर जर संपूर्ण बरोबर असेल तर पूर्ण गुण देण्यास अजिबात संकोच करू नये.

१४) प्रत्येक परीक्षकाने संपूर्ण कामकाजाच्या तासांसाठी म्हणजे दररोज आठ तास मूल्यमापनाचे काम करणे आवश्यक आहे. मुख्य विषयांमध्ये दररोज २० उत्तरपुस्तिकांचे आणि इतर विषयांसाठी दररोज २५ उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. **('स्थल मूल्यमापनासाठीची मार्गदर्शक तत्त्वे' यात तपशील दिलेला आहे.)** हा बदल कमी झालेला अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची संख्या लक्षात घेऊन केला आहे.

१५) भूतकाळात परीक्षकाने केलेल्या खालील सर्वसामान्य चुका तुम्ही करत नसल्याची खात्री करा:-

- उत्तरपुस्तिकेत उत्तर किंवा त्याचा काही भाग मूल्यांकन न करता सोडणे.
- उत्तरासाठी नेमून दिलेल्या गुणांपेक्षा अधिक गुण देणे.
- उत्तरांना दिलेल्या गुणांची चुकीची बेरीज.
- उत्तरपुस्तिकेच्या आतील पानांवरून उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर (पहिल्या पानावर) गुणांचे चुकीचे हस्तांतरण.
- मुखपृष्ठावर प्रश्नक्रमानुसार चुकीची बेरीज.
- प्रश्नक्रमांकानुसार गुण हस्तांतरण न करता क्रमवारीत चुकीचे गुण लिहिणे.
- एकूण बेरीज चुकीची असणे.
- एकूण गुणांचे अक्षरात व अंकात चुकीचे लेखन करणे / त्यात समानता नसणे.
- उत्तरपुस्तिकातून ऑनलाईन पुरस्कार यादीत गुणांचे चुकीचे हस्तांतरण.
- उत्तरे तपासून चिन्हांकित केली, परंतु गुण दिलेले नाहीत.
- अचूक उत्तरासाठी बरोबर (✓) व चुकीच्या उत्तरासाठी चूक (X) या चिन्हांचा योग्य व स्पष्ट वापर करावा.
- उत्तराचा अर्धा किंवा काही भाग बरोबर आणि बाकीचा चूक म्हणून चिन्हांकित केले, परंतु कोणतेही गुण दिले गेले नाहीत.

१६) उत्तरपुस्तकांचे मूल्यमापन करताना उत्तर पूर्णपणे चुकीचे आढळल्यास, त्यावर चूक (X) म्हणून चिन्हांकित केले जावे आणि '0' (अक्षरी - Zero) गुण दिले जावे.

१७) उत्तरपुस्तिकेतील कोणताही मूल्यमापन न केलेला भाग, आतील पानांवरून मुखपृष्ठावर गुण हस्तांतरित न करणे तसेच एकूण गुणांच्या बेरजेतील चूक, अशा प्रकारच्या चुका जर विद्यार्थ्याने निदर्शनास आणून दिल्या तर, मूल्यमापन कार्यात सहभागी झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांची तसेच बोर्डाची प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते. म्हणूनच संबंधितांची प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी, सूचनांचे

काटेकोरपणे आणि विवेकपूर्ण पालन केले जावे.

१८) वास्तविक मूल्यमापन सुरू करण्यापूर्वी परीक्षकांनी **"स्थल मूल्यमापनासाठी मार्गदर्शक तत्त्वे"** मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा बारकाईने अभ्यास करावा.

१९) प्रत्येक परीक्षकाने पुढील गोष्टी काळजीपूर्वक तपासाव्यात –

- सर्व उत्तरांचे योग्य मूल्यमापन केले आहे.
- गुण मुखपृष्ठावर योग्यप्रकारे हस्तांतरित केले आहेत.
- अचूक एकूण बेरीज केली आहे.
- अंकी आणि अक्षरी अचूक गुण लिहिले आहेत.

२०) विद्यार्थ्याने विनंती केल्यावर विहित प्रक्रिया शुल्क भरून उत्तरपुस्तिकेची छायाप्रत मिळवण्याचा अधिकार आहे. हे लक्षात घेऊन, सर्व परीक्षक/अतिरिक्त मुख्य परीक्षक/मुख्य परीक्षक यांनी या गोष्टीची ठळकपणे नोंद घ्यावी की, त्यांनी गुणदान पद्धतीमध्ये दिलेल्या प्रत्येक उत्तरासाठी आवश्यक मुद्द्यांनुसार व काटेकोरपणे मूल्यमापन केले आहे.

**MARKING SCHEME**

Secondary School Examination, 2025

**MARATHI (Subject Code: 009)**

[Paper Code:8]

**Maximum Mark: 80**

| **General Instructions:** | |
|---|---|
| 1. | You are aware that evaluation is the most important process in the actual and correct assessment of the candidates. A small mistake in evaluation may lead to serious problems which may affect the future of the candidates, education system and teaching profession. To avoid mistakes, it is requested that before starting evaluation; you must read and understand the spot evaluation guidelines carefully. |
| 2. | "Evaluation policy is a confidential policy as it is related to the confidentiality of the examinations conducted, Evaluation done and several other aspects. It's leakage to public in any manner could lead to derailment of the examination system and affect the life and future of millions of candidates. Sharing this policy/document to anyone, publishing in any magazine and printing in News Paper/Website etc may invite action under various rules of the Board and IPC." |
| 3. | Evaluation is to be done as per instructions provided in the Marking Scheme. It should not be done according to one's own interpretation or any other consideration. Marking Scheme should be strictly adhered to and religiously followed. However, while evaluating, answers which are based on latest information or knowledge and/or are innovative, they may be assessed for their correctness otherwise and due marks be awarded to them. In class-X, while evaluating two competency-based questions, please try to understand given answer and even if reply is not from marking scheme but correct competency is enumerated by the candidate, due marks should be awarded. |
| 4. | The Marking scheme carries only suggested value points for the answers These are in the nature of Guidelines only and do not constitute the complete answer The students can have their own expression and if the expression is correct, the due marks should be awarded accordingly. |
| 5. | The Head-Examiner must go through the first five answer books evaluated by each evaluator on the first day, to ensure that evaluation has been carried out as per the instructions given in the Marking Scheme. If there is any variation, the same should be zero after delibration and discussion. The remaining answer books meant for evaluation shall be given only after ensuring that there is no significant variation in the |

| | |
|---|---|
| | marking of individual evaluators. |
| 6. | Evaluators will mark(✓) wherever answer is correct. For wrong answer CROSS 'X' be marked. Evaluators will not put right (✓) while evaluating which gives an impression that answer is correct and no marks are awarded. This is most common mistake which evaluators are committing. |
| 7. | If a question has parts, please award marks on the right-hand side for each part Marks awarded for different parts of the question should then be totaled up and written in the left-hand margin and encircled. This may be followed strictly. |
| 8. | If a question does not have any parts, marks must be awarded in the left-hand margin and encircled. This may also be followed strictly. |
| 9. | If a student has attempted an extra question, answer of the question deserving more marks should be retained and the other answer scored out with a note "Extra Question". |
| 10. | No marks to be deducted for the cumulative effect of an error. It should be penalized only once. |
| 11. | A full scale of marks _______(example 0 to 80/70/60/50/40/30 marks as given in Question Paper) has to be used. Please do not hesitate to award full marks if the answer deserves it. |
| 12. | Every examiner has to necessarily do evaluation work for full working hours ie, 8 hours every day and evaluate 20 answer books per day in main subjects and 25 answer books per day in other subjects (Details are given in Spot Guidelines). This is in view of the reduced syllabus and number of questions in question paper. |
| 13. | Ensure that you do not make the following common types of errors committed by the<br>Examiner in the past-<br>• Leaving answer or part thereof unassessed in an answer book.<br>• Giving more marks for an answer than assigned to it. Wrong totaling of marks awarded on an answer.<br>• Wrong transfer of marks from the inside pages of the answer book to the title page.<br>• Wrong question wise totaling on the title page. Wrong totaling of marks of the two columns on the title page.<br>• Wrong grand total.<br>• Marks in words and figures not tallying/not same.<br>• Wrong transfer of marks from the answer book to online award list. |

| | |
|---|---|
| | • Answers marked as correct, but marks not awarded. (Ensure that the right tick mark is correctly and clearly indicated. It should merely be a line. Same is with the X for incorrect answer.)<br>• Half or a part of answer marked correct and the rest as wrong, but no marks awarded. |
| 14. | While evaluating the answer books if the answer is found to be totally incorrect, it should be marked as cross (X) and awarded zero (0) Marks. |
| 15. | Any un assessed portion, non-carrying over of marks to the title page, or totaling error detected by the candidate shall damage the prestige of all the personnel engaged in the evaluation work as also of the Board. Hence, in order to uphold the prestige of all concerned, it is again reiterated that the instructions be followed meticulously and judiciously. |
| 16. | The Examiners should acquaint themselves with the guidelines given in the "Guidelines for spot Evaluation before starting the actual evaluation. |
| 17. | Every Examiner shall also ensure that all the answers are evaluated, marks carried over to the title page, correctly totaled and written in figures and words. |
| 18. | The candidates are entitled to obtain photocopy of the Answer Book on request on payment of the prescribed processing fee. All Examiners/Additional Head Examiners/Head Examiners are once again reminded that they must ensure that evaluation is carried out strictly as per value points for each answer as given in the Marking Scheme. |

Set – 4

# MARKING SCHEME
# MARATHI

| प्रश्न क्र. | उपप्रश्न | अपेक्षित उत्तर/महत्त्वाचे मुद्दे | गुण |
|---|---|---|---|
| | | **विभाग अ (वाचन व आकलन)** | |
| **1.** | **a** | **त्याआधारे उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही ५)** | **५** |
| | i | C) पृथ्वीचा | |
| | ii | D) मानवतेचा बोध | |
| | iii | B) नालंदा, तक्षशीला विद्यापीठांना | |
| | iv | B) सोने | |
| | v | A) ज्ञान आणि वैभव प्राप्त करून घेतले. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | vi | C) तक्षशीला | |
| | **b** | **खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ३)** | **३** |
| | i | लेखकाने गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी, कावेरी, नर्मदा या नद्यांचा उल्लेख केला आहे. (यापैकी विद्यार्थ्याने २ नद्यांची नावे जरी लिहिली तरी पूर्ण गुण देण्यात यावा) | |
| | ii | चाणक्य अर्थशास्त्रज्ञ व राजकारणपटू होते. (यापैकी विद्यार्थ्याने अर्थशास्त्रज्ञ व राजकारणपटू यापैकी १ जरी लिहिले तरी पूर्ण गुण देण्यात यावा) | |
| | iii | वेद, उपनिषदे, गीता हे जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ आहेत. (यापैकी विद्यार्थ्याने २ प्राचीन ग्रंथांची नावे जरी लिहिली तरी पूर्ण गुण देण्यात यावा) | |
| | iv | व्यास, भवभूती, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, तुलसीदास या प्रतिभावंत कवींचा उल्लेख लेखकाने केला आहे. (यापैकी विद्यार्थ्याने २ प्रतिभावंत कवींची नावे जरी लिहिली तरी पूर्ण गुण देण्यात यावा) | |
| 2. | **a)** | **कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही ४)** | **४** |
| | i | C) कर्पुराचा / कर्पूराचा | |
| | ii | B) बिकट | |
| | iii | B) आकांक्षांना | |
| | iv | D) धैर्याची | |
| | v | A) मागे वळणार नाही | |
| | **b)** | **कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ३)** | **३** |
| | I | कवी संकटांना उद्देशून बोलत आहे. | |
| | Ii | कवी वर्मी बसणारे घाव आनंदाने सहन करणार आहे. | |
| | Iii | कवीने संकटांना स्वतः वर चालून येण्याचे आव्हान दिले आहे. | |
| | Iv | येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी कवी कट्यारीचा उपयोग करणार आहे. | |
| | V | शेवटी कवी म्हणतात की मी कधीही गाफील / बेसावध असणार नाही./ सावध /सतर्क राहील. | |
| | | **विभाग – ब (व्याकरण)** | |
| **3.** | **a)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही ४)** | **४** |
| | i | A) मुलगा | |
| | ii | A) आणि | |

| | | | |
|---|---|---|---|
| | iii | D) क्रियाविशेषण अव्यय / अव्यव (प्रश्नपत्रिकेत अव्यव लिहिलेले असल्याने त्याचे गुण कमी करू नयेत) | |
| | iv | B) सावकाश | |
| | v | C) शब्दयोगी अव्यय | |
| | **b)** | **सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही ३)** | **३** |
| | i | भविष्यकाळ | |
| | ii | भविष्यकालीन वाक्य- खर्च केलेल्या पैशांचा मी हिशोब करेल / करणार / करत असेल / करणार असेल / करणार आहे/ करेन.- पूर्ण गुण द्यावेत. | |
| | iii | वर्तमानकाळातील वाक्य – गावात शाळेसाठी खूप मदत मिळते / मिळत आहे/ मिळाली आहे / गावात शाळेसाठी खूप मदत मिळत असते - पूर्ण गुण द्यावेत. | |
| | iv | भूतकालीन वाक्य – नितीनने सकाळी व्यायाम केला / केला होता / नितीन सकाळी व्यायाम करत होता./ करीत असे.- पूर्ण गुण द्यावेत. | |
| | **c)** | **सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही ३)** | **३** |
| | i | प्रश्नार्थी वाक्य / प्रश्नवाचक वाक्य / प्रश्नार्थक | |
| | ii | विधानार्थी होकारार्थी वाक्य–उमेशच्या घरापासून नदी जवळ / समीप / निकट/ नजीक आहे. | |
| | iii | आज्ञार्थी वाक्य – मुलांनो, खूप खेळा.<br>OR<br>कृपया, मुलांनो खूप खेळा. | |
| | iv | ओहो! / बापरे! / वा! / अरेच्चा! / अय्या! किती छान आहे तुझा आवाज ! /<br>ओहो! / बापरे! / वा! / वा वा ! तुझा आवाज खूप छान आहे. /<br>किती/केवढा/खूप छान आहे तुझा आवाज ! / तुझा आवाज खूप छान आहे!<br>वा! किती छान आहे तुझा आवाज!<br>अरे वा! छान आहे तुझा आवाज!<br>[ केवलप्रयोगी अव्यय नसेल व उद्गारवाचक चिन्ह असेल तर पूर्ण गुण द्यावेत. उद्गारवाचक चिन्ह नसेल तर अर्धा गुण द्यावेत ] | |
| | **d)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **२** |
| | i | निश्चितपणे एकवचनी शब्द- C) डोळा | |
| | ii | झाडाखाली फळं / फळे पडली आहे. / झाडाखाली फळं /फळे पडली आहेत. (पूर्ण गुणदान)<br>'फळे' फक्त शब्द लिहिला असेल तर अर्धा गुण द्यावा<br>'फळे' लिहून पुढील वाक्य जसेच्या तसे लिहिले असल्यास अर्धा गुण देण्यात यावा. | |
| | iii | अनेकवचनी शब्द- गाड्या | |
| 4 | **a)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **२** |

| | | | |
|---|---|---|---|
| | i | भिन्नलिंगी शब्द- C) खडू | |
| | ii | लिंगविचारानुसार गटात न बसणारा शब्द- B) होडी | |
| | iii | लिंग बदला- B) माकडीण | |
| | **b)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | २ |
| | i | समानार्थी शब्दाची योग्य जोडी- C) विनय = नम्र | |
| | ii | गटात न बसणार शब्द- A) कष्ट | |
| | iii | समानार्थी शब्दाची - D) जग | |
| | **c)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | २ |
| | i | विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी- A) समान X असमान | |
| | ii | जवळ - B) लांब | |
| | iii | दुरुस्त - D) नादुरुस्त | |
| | **d)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | २ |
| | i | प्रश्नपत्रिकेतील या प्रश्नाच्या कोणत्याही पर्यायाला पूर्ण गुणदान करण्यात यावे. | |
| | ii | प्रश्नपत्रिकेतील या प्रश्नाच्या कोणत्याही पर्यायाला पूर्ण गुणदान करण्यात यावे. | |
| | iii | प्रश्नपत्रिकेतील या प्रश्नाच्या कोणत्याही पर्यायाला पूर्ण गुणदान करण्यात यावे. | |
| **विभाग – क (पाठ्यपुस्तकावर आधारित)** | | | |
| 5 | a) | **एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** | ३ |
| | i | दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा! अशी भीष्मप्रतिज्ञा पंतांनी केली होती. | |
| | ii | कथेचे दुसरे नाव गोष्ट आहे. | |
| | iii | आपली पावले हवेत कार्बन किती प्रमाणात सोडतात/ कार्बन उत्सर्जन करतात यावरून पावलांचा काळा रंग ठरतो. | |
| | iv | निरंजनने नागरिकशास्त्र या विषयाची परीक्षा दिली नाही. | |
| | v | अब्दुल तपोवनात कुष्ठरोगी बायकांना/ तपोवनातील स्त्रियांना व मुलींना बांगड्या भरण्यासाठी जात होता. | |
| | **b)** | **खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही ३)**<br>**उत्तराचा फक्त पर्याय लिहिला असल्यास पूर्ण गुणदान करण्यात यावे.** | ३ |
| | i | हायस्कूलमध्ये भावे सर **भौतिकशास्त्र** विषय शिकवत होते. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ii | या शाली घेऊन मी आता **शालीन** बनू लागलो आहे. | |
| | iii | थोरांची चरित्रे **सामान्यांना** प्रेरणा देतात. | |
| | iv | पहिला उपाय म्हणून मी **आहार परिवर्तन** सुरू केले. | |
| | v | देवळातल्या पहारेकऱ्याने **दोनचे** टोले दिले. | |
| | **c)** | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ३० ते ४० शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही १) (स्वमतावरील प्रश्नांना प्रस्तावना लिहिली नसली तरी पूर्ण गुणदान करावे.)** | **३** |
| | i | शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर लेखक रा.ग. जाधव संध्याकाळी नेहमी फिरायला जात. एके दिवशी कडक थंडीत एक अशक्त व म्हातारा भिक्षेकरी कट्ट्याला लागून चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत असताना दिसला. लेखकाला त्याची दया आली म्हणून लेखकांनी त्याला दुसऱ्या दिवशी दोन शाली नेऊन दिल्या. पण त्या म्हाताऱ्या माणसाला त्या शाली आपल्याला शोभणार नाहीत त्यापेक्षा त्या विकून टाकल्या तर निदान दोन-तीन दिवस पोटभर जेवता येईल असा विचार करून त्या वृद्धाने शाली विकून टाकल्या. पोटाच्या आगीपुढे वृद्ध व्यक्तीला शालीची शोभा महत्वाची वाटली नाही. अशा प्रकारे वृद्धाने केलेला शालीचा उपयोग केला. [ या मुद्द्यांव्यतिरिक्त, प्रश्नाशी सबंधित, कोणतेही ३ योग्य मुद्दे विद्यार्थ्यांनी स्वमताने लिहिल्यास पूर्ण गुणदान करावे.] | |
| | ii | डॉक्टर माशेलकरांना शालेय जीवनात शिक्षकांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. यामुळे त्यांचा शिक्षणाचा पाया भक्कम झाला पण त्याचबरोबर त्यांच्या मनात शिक्षणाची ओढ निर्माण झाली. माशेलकरांच्या हायस्कूलमधील शिक्षकांमध्ये असलेली सेवाभावीवृत्ती, स्वतःला झोकून देऊन शिकवणे व निरपेक्ष भावनेने मार्गदर्शन करण्याची वृत्ती शिक्षकांमध्ये आहे असे लेखक सांगतात. अर्थातच हे सर्व गुण डॉक्टर रघुनाथ माशेलकरांमध्येही आले आणि त्यामुळे त्यांच्या आयुष्याचाही पाया पक्का झाला असे ते म्हणतात. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात शिक्षकांना एक महत्त्वाचे स्थान असते. तसेच अढळस्थान डॉक्टर माशेलकरांच्या जीवनात त्यांच्या शिक्षकांचे आहे. (वरीलपैकी कोणतेही ३ मुद्दे) | |
| | iii | अभिषेकचे बाबा म्हणाले की आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरून गेलो आहे. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईक वापरतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळे मॉर्निंग वॉक केला जातो यात विरोधाभास दिसतो. आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज द मस्ट (स्वमतावर उत्तर असल्याने विद्यार्थ्यांनी पाठावर आधारित ३ मुद्दे लिहिले तरी पूर्ण गुणदान करावे.] | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **d)** | **कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांतील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**<br>उत्तरासाठी फक्त वाक्प्रचार लिहिला असेल, वाक्प्रचार वाक्यात लिहिलेले असोत किंवा नसोत, जोडी लावली असो किंवा नसो तरी बरोबर उत्तरला गुणदान करण्यात यावे. | ५ |
| | i | उपदव्याप करणे - नको त्या गोष्टी करणे. | |
| | ii | रममाण होणे – मग्न होणे. | |
| | iii | सहभागी होणे - झोकून देणे. | |
| | iv | निराश होणे – खचून जाणे. | |
| | v | मदत करणे - हातभार लावणे. | |
| 6 | **a)** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. (कोणतेही ४)** | ४ |
| | i | आगीच्या जवळ जाणाऱ्या बाळाला पाहून त्याला वाचवण्यासाठी त्याची दयाळू आई धावत येते. | |
| | ii | या देशाच्या अमुचा / आमचा / भारतवासीयांचा / आपल्या सर्वांचा / शेतकऱ्यांचा अधिकार आहे. | |
| | iii | इंदिरा संतांना आपल्या जीवापेक्षा सैनिकांच्या / जवानांच्या पराक्रमाची / शौर्याची गोष्ट मोठी वाटते | |
| | iv | कवीच्या सहाय्यास त्याचे अश्रू / डोळ्यातील अश्रू/ आसवं मित्र म्हणून धावून आले. | |
| | v | संत नामदेवांनी स्वतःला चातक म्हटले आहे. | |
| | vi | कवयित्रीने डोळ्यांतील अश्रूंना निरांजनातल्या ज्योतीची उपमा दिली आहे. | |
| | **b)** | **खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही ४)**<br>**जरी विद्यार्थ्यांनी पूर्ण वाक्य लिहिले नसल्यास, फक्त पर्याय लिहिले असल्यासही पूर्ण गुणदान करावे]** | ४ |
| | i | चैतन्याचे फिरे **C) सुदर्शन** | |
| | ii | **B) भाकरीचा** चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. | |
| | iii | अंकिला मी **C) दास** तुझा. | |
| | iv | हजार आम्ही **A) एकी** बळकट | |
| | v | **A) दीनदुबळ्यांचे** असे तुला एकच औक्षण. | |
| | c) | **खालीलपैकी काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (कोणतेही १)**<br>संदर्भात कवी व कवितेचे नाव लिहिले असेल तर १ गुण व स्पष्टीकरणाला | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २ गुण द्यावेत.<br>एखाद्या विद्यार्थ्याने वैशिष्ट्य लिहिले नसेल तरी गुण कमी करू नयेत. विद्यार्थ्यांनी काव्यपंक्तींचे अर्थासह स्पष्टीकरण स्वतःच्या शब्दात लिहिल्यासही पूर्ण गुणदान करावे. | |
| | i | **संदर्भ** - प्रस्तुत काव्यपंक्ती दोन दिवस या कवितेतील असून त्याचे कवी नारायण सुर्वे आहेत. या कवितेतून त्यांनी कामगारांच्या जीवनाच्या वास्तवाचे चित्रण केले आहे.<br>**स्पष्टीकरण** – नेहमी जगाच्या सुखाचा विचार करणारा हा कामगार आपल्याच जगात रममाण होतो. त्याच्या आयुष्यामध्ये अनेक अडचणी येतात. तो आपल्या संकटांवर व दुःखांवर मात करतो. ही शिकवण जगाच्या शाळेत शिकतो.<br>**वैशिष्ट्ये-** सध्या, सोप्या शब्दांत कवीने सकारात्मक विचार/ दृष्टीकोन मांडला आहे. | |
| | ii | **संदर्भ-** दिलेल्या ओळी स्वप्न करू साकार या कवितेतील असून याचे कवी किशोर पाठक आहेत. कवीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न चित्रित केले. / देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी एकजुटीने राहू असे कवी सांगतो.<br>**स्पष्टीकरण** – कवी आपल्या देशाचे वर्णन करताना अभिमानाने सांगतो की या देशाच्या मातीवरती म्हणजेच या मायभूमीवर आपला अधिकार आहे. त्यामुळे नव्या पिढीचे, भारताच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न आपण सर्वजण साकार करून, प्रत्यक्षात आणू. म्हणूनच कवी म्हणतात की, येथील संस्कृती, येथील परंपरा यांचे जतन करू.<br>**वैशिष्ट्य-** स्वप्न करू साकार या कवितेमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, आशावाद पाहायला मिळतो. अत्यंत साध्या व सोप्या भाषेमध्ये देशाविषयीच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न तो बघत आहे. | |
| 7 | a) | **खालीलपैकी प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ५)** | **५** |
| | i | डॉ.होमी भाभा यांचे व्यक्तिमत्त्व प्रचंड स्फूर्तिदायक होते. | |
| | ii | व्युत्पत्तीकोश म्हणजे अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह होय. | |
| | iii | लेखक बार्कमध्ये इंजिनियर या पदावर रूजू झाले. | |
| | iv | 'इनामदार' हा शब्द इनाम- अरबी, दार- फारसी भाषेतून आला आहे. (यात अरबी/फारसी एका भाषेचा उल्लेख आला असल्यास पूर्ण गुणदान करावे.] | |
| | v | मराठीतील 'अत्तर' हा अरबी भाषेतील शब्द 'इत्र' या शब्दापासून आला आहे. | |
| | vi | भारतात अणुसंशोधनाचा पाया डॉ. होमी भाभा यांनी घातला. | |
| | vii | डॉ. अनिल काकोडकर यांनी पत्र मोठे होत असलेल्या मुलांना उद्देशून लिहिले आहे. | |
| **विभाग – ड (लेखन)** | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | a) | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 120 – 150 शब्दांत लेखन करा.** | ५ |
| | | पुढील मुद्द्यांचा सारासार विचार करून<br>एकत्रित गुणदान करावे. (शब्दमर्यादा 120 ते 150)<br>**• निबंध आवश्यक मुद्दे –**<br>आकर्षक सुरूवात व परिणामकारक शेवट,<br>विषयविस्तार, तर्कशक्ती, उपयोजन कौशल्य, मुद्देसूद लेखन,<br>योग्य विरामचिन्हांचा वापर, शुद्धलेखन,<br>काव्यपंक्ती, वाक्प्रचार, म्हणींचा सुयोग्य वापर.<br>(आत्मवृत्त या निबंध प्रकारातला निबंध लिहिला नसेल तर दृश्य बघून २ गुण देण्यात यावेत.)<br>OR<br>**कथा आवश्यक मुद्दे –**<br>(कथा शीर्षक - १ तात्पर्य – १ कथालेखन – ३)<br>कथेला समर्पक शीर्षक,<br>आकर्षक प्रारंभ व समर्पक शेवट,<br>ओघवती भाषाशैली, उत्कंठावर्धक मांडणी,<br>मुद्देसूद मांडणी, कल्पकता, रंजकता,<br>संवाद व विरामचिन्हांचा यथायोग्य वापर<br>– दोन्ही लेखन प्रकारात यांचा सारासार विचार करून गुणदान<br><br>• शुद्धलेखन. (शुद्धलेखनात अल्प चुका असल्यास गुण कमी करू नये.)<br>• यथायोग्य समारोप. | |
| | b) | **खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही १ )** | ५ |
| | | **आवश्यक मुद्दे –**<br>**दिनांक** – पत्राच्या सुरूवातीला वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा.<br>**मायना** – ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे.<br>**विषय** – मोजक्या शब्दांत लिहावा.<br>**मजकूर –** मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा. समर्पक, मुद्देसूद रचना असावी. भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी.<br>**शेवट व समारोप** – पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता असावा. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पत्रलेखनात दोन्ही पत्ते, दिनांक, विषय या सर्व गोष्टी पत्राच्या डाव्या बाजूलाच असाव्यात.<br>**टीप** – लिफाफा आवश्यक (हे पत्रलेखन आहे. ई-मेल नाही. त्यामुळे पत्र लिहिल्यानंतर शेवटी ई-मेल लिहिला नसेल, तरी चालेल.)<br>**गुण विभागणी –**<br>दिनांक व प्रति – ०.५<br>विषय – १<br>मजकूर – २<br>शेवट व समारोप – ०.५<br>लिफाफा- १ | |
| | c) | **खालील दिलेल्या विषयावर जाहिरातलेखन करा. [कोणतेही १]** | **५** |
| | | **आवश्यक मुद्दे –**<br>• विषयाला धरून आकर्षक मजकूर<br>• साधी, सोपी आकर्षक, स्पष्ट, ओघवती भाषा<br>• ग्राहकांच्या मनात विश्वासार्हता<br>• वेचक, अर्थपूर्ण<br>• वाचकांशी संवाद साधणारी<br>आकर्षक जाहिरात छान असेल तर पूर्ण गुण देण्यात यावेत. | |

(**महत्त्वाची सूचना** – वरील उत्तरपत्रिका शिक्षकांच्या संदर्भासाठी तसेच उत्तरपत्रिका तपासण्यास साहाय्य व्हावी, या हेतूने तयार केली गेलेली आहे. तरी 'भाषा' विषय असल्यामुळे मुलांची अभिव्यक्ती विचारात घेऊन, विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे, मांडलेले विचार जर मुद्देसूद व समर्पक असतील तर त्या अनुषंगाने गुणदान करण्यात यावे.)